।। विद्या परम दैवतम ।।

ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ
द्वारा संचालित
# डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

**डॉ. खत्री महाविद्यालयात सत्कार सोहळा संपन्न:**

स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकुम, चंद्रपूर येथे 5 ऑक्टोबर 2024 रोजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय डॉ. एन. एच.खत्री सर यांचे अध्यक्षतेखाली सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी मा.आमदार सुधाकरजी अडबाले सर विधान परिषद सदस्य (म.रा.), संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्रा. दिपकजी गुंटेवार सर,संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. बी. कपूर सर, संस्थेच्या कोषाध्यक्षा मा. अनुश्री पाराशर मॅडम, माजी प्राचार्य मा.विजय हेलवटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर आदी मान्यवर विचार मंचावर उपस्थित होते. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली सत्र 2023 - 24 मध्ये विविध विषयात प्राविण्यप्राप्त (मेरिट) मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचा व आचार्य पदवी प्राप्त संशोधक विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी मा. आमदार सुधाकर अडबाले सर यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

गोंडवाना विद्यापीठाने डॉ. खत्री महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालय या पुरस्काराने सन्मानित केल्याच्या पार्श्वभूमीवर संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. एन.एच. खत्री सर यांचा मा.आमदार सुधाकरजी अडबाले सर यांचे हस्ते गौरव करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एस. बी. मोहितकर, माजी अधीक्षक प्रमोद राऊत, मा. राजू पांडे यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सत्कार सोहळ्याला महाविद्यालयातीलप्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.







डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
डॉ.खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर


डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह

